# " चैतन्य लहरी "



## प. पू. श्री माताजी निर्मलादेवी

**मराठी आवृत्ती खंड ५ वा अंक ३ व ४ था**

" अधोगतीला जाणे अत्यंत सोपे आहे पण आपली स्थिती
सांभळणे कठीण असते आणि प्रगती करणे हे त्याहूनही कठीण असते."

– श्री माताजी

# भगवान श्री शिव

श्री शिव : देवाधीदेव आहेत. परम पिता आहेत आणि ते परमपूज्य श्रीमाताजी निर्मला देवी यांच्या हृदयात वास करतात.

श्रीमाताजी 'श्री शिव नित्य शुद्ध व निष्कलंक आहेत.'

प्रार्थना – हे परमेश्वरा, आम्हाला शक्ति द्या व ज्याच्यामुळे, सुख, अहंकार व इतर सर्व ज्ञान आनंदाच्या लोभातून आम्ही मुक्त होऊन विशुद्ध आनंद हे ज्याचे रूप आहे अशा निराबाधित शिवतत्वा मधे आम्ही स्वतःस झोकून देऊ, अशी आम्हाला सतत प्रेरणा द्या.

तुम्ही परमेश्वरावर तन-मन व हृदयापासून जीवापाड प्रेम करावे अशी प्रथम व श्रेष्ठ परमेश्वरी आज्ञा आहे. –श्री येशू ख्रिस्त

श्रीकृष्ण –: जे अविनाशी, अनंत, अव्यक्त, सर्वशक्तिमान, विचारांच्या पलिकडे असलेल्या, पवित्र व न बदलणाऱ्या एकमेव अशा चिरंतनाची उपासना करतात आणि ज्यांच्या आत्म्याच्या सर्व शक्ति सुसंवादित आहेत आणि सर्वांच्या बद्दल त्यांच्या हृदयात सारखेच प्रेम आहे, आणि इतरांच्या कल्याणात ज्यांना आनंद मिळतो, ते खरोखरीच मजप्रत येतात. मानवाला सर्व श्रेष्ठत्वाचा मार्ग मिळविणे कठीण आहे. तरीही श्रेष्ठत्वावर दृष्टी ठेऊन त्याच्यासाठी जे परिश्रम घेतात ते धन्य होत.

परमेश्वरा तुम्ही माझ्या मस्तकात व बुद्धीत वास्तव्य करा.
परमेश्वरा तुम्ही माझ्या नेत्रात आणि दृष्टीत वास्तव्य करा.
परमेश्वरा तुम्ही माझ्या मुखात आणि वाणीत वास्तव्य करा.
परमेश्वरा तुम्ही माझ्या हृदयात व प्रेमशक्तित वास्तव्य करा.
परमेश्वरा तुम्ही माझ्या जीवनात व भक्तित वास्तव्य करा.

### श्रीशिव

श्रीशिव म्हणजे कल्याणकारक व आत्मा आणि परमात्मा आहेत.

ते वरदायी व तपः साधनेचे पुनररचनात्मक आहेत.
ते संहारक व रक्षक आहेत.
ते पति आणि पिता आहेत, विश्वाचे गुरु आहेत.
ते नटराज व संगीताचे गुरु आहेत.
ते महायोगी, आणि शुद्ध व पवित्र आहेत.
ते क्षमाशील व कृपाळू आहेत.
त्यांच्या अंतिम, सर्वोच्च म्हणजेच सदाशिवांच्या रूपात—
ते मूर्ताच्या व संकल्पनेच्या पलिकडे आहेत.
ते मायेच्या व चित्ताच्या पलिकडे आहेत.
ते निर्गुण आहेत व अंतिम सत्य आहेत.
ते निराबाधित असून सर्वेश्वर आहेत.
ते श्रीमाताजी निर्मला देवीच्या हृदयात वास करतात.

मानवी जीवनाचे अंतिम ध्येय, आत्मसाक्षात्कार व परमेश्वरी साक्षात्कार मिळविणे आहे ते श्रीमाताजींच्या चरणकमळाशी शरणागत झाल्याशिवाय प्राप्त होणे अशक्य आहे.

श्रीमाताजी, श्रीशिवांचे म्हणजे जे अंतिम आहेत, त्यांचे ज्ञान देतात. त्या रूपिणी शिवशक्तैक्य रूपिणी आहेत. म्हणजेच त्यांच्या रूपात श्रीशिव व श्रीशक्ती यांचे एकरुपत्व आहे. पुराणात म्हटले आहे की, शक्तिशिवाय शिव नाही व शिवाखेरीज शक्ति नाही. त्यांच्यात वेगळे पण नाही. चंद्र व त्याचे चांदणे जसे एक असतात, तसे त्या व श्रीशिव एक आहेत.

### परमपूज्य श्री माताजीच्या प्रवचनातील काही भाग-

आपल्यामध्ये आत्मा ही सर्वात मौल्यवान वस्तू आहे. त्याचे मोजमाप करता येत नाही. म्हणूनच त्याला चिरंतन मूल्य असलेला असे म्हणतात. तो अनंत असल्याने आपण त्याचे मोजमाप करू शकत नाही.

सर्वशक्तिमान परमेश्वर, सत्-चित्त-आनंद आहे, असे आपण म्हणतो. सत् म्हणजे सत्य, मानवी सत्य सापेक्ष असते, पण मी जे सत्य तुम्हांस सांगत आहे ते निराबाधित असून त्याच्यापासून सर्व व्यवहार सुरू होतात.

सत् हा पुरुष आहे, म्हणजेच परमेश्वर आहे. तो निर्मितीत सहभागी होत नाही. परंतु तो निर्मितीला आधारभूत असतो. उदा. माझ्या हातात दिवा आहे व मी सर्व प्रकारचे काम करीत आहे. दिव्याशिवाय मी काहीच करु शकणार नाही. दिवा हा मला माझ्या कामात सहाय्यभूत आहे परंतु माझ्या कामात तो प्रत्यक्ष भाग घेत नाही. त्याच प्रमाणे परमेश्वर प्रकाशासारखा फक्त साक्षीरूप असतो.

परमेश्वराचा दुसरा गुण म्हणजे चित् चित् म्हणजेच चित् चित्र जेव्हा स्पंदित होते, (संस्कृतमध्ये स्पंदन हा फार चांगला शब्द आहे) अथवा स्पंदन पावतो त्यावेळी त्याच्या चित्ताद्वारे निर्मितीस सुरुवात होते.

त्याचा तिसरा गुण म्हणजे आनंद. त्याला त्याच्या आकलना-तून म्हणजे व निर्मितीतून मिळणारा आनंद ! सत्-चित् आनंद जेव्हा शून्य स्थितीमध्ये येतात आणि जेव्हा एकरुप होतात, तेव्हा ब्रह्मतत्त्व होते.

हे तिन्ही गुण एक असतात तेव्हा संपूर्ण शांतता असते. कशा-चीही निर्मिती होत नाही वा अभिव्यक्ति होत नाही. आनंद व चित् एकरुप होतात. कारण चित् आनंदात विलीन होते. व आनंद सत्शी एकरुप होतो. एकात्म असलेले सत्-चित्-आनंद वेगळे होतात, तेव्हा तीन प्रकारच्या तत्वांची निर्मिती करतात.

आनंद निर्मितीबरोबर प्रवाहीत होतो, त्यावेळी निर्मितीविरुद्ध दिशेने पहिल्या स्थितीपासून म्हणजे सत्पासून असत् कडे म्हणजेच मायेकडे प्रवाहीत होते. हा प्रवाहाचा एक भाग झाला.

ज्यावेळी परमेश्वर प्राप्तीकडे तुम्ही वळता त्यावेळी प्रवाहाचा दुसरा भाग सुरु होतो. ती क्रिया हळूहळू उच्च, उच्चत्तम. सूक्ष्म, सूक्ष्मतम होत जाते. मानवी आनंद हा प्राण्यांच्या आनंदापेक्षा अधीक सुंदर असतो. तेव्हा आनंद सुद्धा त्याची अभिव्यक्ती बदलू लागतो.

परमेश्वर प्राप्तिच्या मार्गावर तुम्ही चालू लागल्यावर अधीक आनंदाचा, अधिक विस्तृत आनंदाचा लाभ होतो. कुत्र्याला सौंदर्य व्यवस्थितपणा इत्यादी समजत नाही तेव्हा मानव झाल्यावर ज्या स्थितीमध्ये तुम्ही असता, तेवढ्या प्रमाणात तुमच्यातील सत् म्हणजे तुमची जाणीव विकसीत होते, तेवढ्या प्रमाणात तुमचा आनंद, तेवढ्या प्रमाणात तुमची सृजनशीलताही विकसीत होते. आता तुम्हाला परमेश्वरी सृजनशीलता माणसाच्या हातात, तो जेव्हा पर-मेश्वराकडे वळतो तेव्हा कशी जाते. ईश्वरी आनंद माणसाच्या हाती कसा येतो. परमात्म्याचा प्रकाश माणसाच्या हृदयात आत्म्याच्या रुपाने कसा येतो ते समजेल. ते फार सुंदर आहे.

# श्री महालक्ष्मी पूजा

(परम पूज्य श्रीमाताजींच्या भाषणाचा सारांश)

आज आपण या मंगल दिवशी एकत्र आलो आहोत, या विशेष पूजेसाठी या पूजेला महालक्ष्मी पूजा असे म्हणायला हवे कारण या पूजेचा लाभ या देशातील व जगातील कारखानदारीला होणार आहे जोपर्यंत मानवी उद्योग परमेश्वराशी निगडीत होत नाहीत, तोपर्यंत त्या प्रयत्नास पूर्णत्व व विशेष स्थान प्राप्त होऊ शकत नाही. यामुळे अतिशय हुशार लोक म्हणून ज्ञात असलेल्या पश्चिमेकडे सुद्धा अनेक अडचणी आहेत कारण त्यांना संतुलन नाही, त्यांना हे ज्ञान नाही की परमेश्वराची शक्तिच सर्वकाही करते व ती शक्ति नाकारल्यास, त्याचे परिणाम काय होतात ! अशा प्रकारच्या विविध कामांच्यासाठी आपण या पृथ्वीवरील अनेक वस्तू वापरत असतो परंतु त्या वस्तू हेतुसाठी रचनात्मक कार्यासाठी, दुसऱ्यांना मदत करण्यासाठी घेतल्या, तर त्यामध्ये संतुलन राहील पृथ्वीमाता जे महान आहेत परमेश्वराशी संलग्न आहेत. त्यांच्यासाठी अधीक साधने निर्माण करू शकते. परंतु जे लोक केवळ स्वतःसाठी अथवा स्वतःचा हेतु साध्य करण्यासाठी अर्थप्राप्ति करतात, त्यांचेसाठी पृथ्वी काहीच करीत नाही. आपला विचार सर्वसमावेशक असावा. हे सर्व करून काय साधते याचा विचार हवा. जगात इतकी कारखानदारी वाढली आहे पण परमार्थ वाढला नाही. त्यामुळे ते लोक सुखी नाहीत. त्यांना मनःशांती नाही. त्यांच्या मुलांना कुटुंबांना त्रास होतो. म्हणून संतुलन असावे. आपल्या देशात फार वेगाने कारखानदारी वाढली नाही. याचेसाठी आपण परमेश्वराचे आभारी असावे.

कारखानदारीबरोबर हस्तकलाही विकसीत व्हायला हवी. नाहीतर कारागिरांच्याकडे कोण लक्ष देईल? मशिन व मानवी क्रिया किंवा कला आणि उद्योग यांच्यात संतुलन असायला हवे. कष्ट करणाऱ्यांना कला अतिशय सुखदायी असते. कला आणि संगीत यांच्यामुळे त्यांना समाधान मनःशांती व आराम मिळेल. सर्व उद्योगांनी काहीतरी प्रकल्प हाती घ्यावेत वा काहीतरी कलात्मक वस्तू बनवाव्यात. आपल्या देशात कारखानदारीस कमी लेखले जाते. जणू काही उद्योजक नफेखोर आहेत व राजकारणी मात्र तेवढे संत आहेत! उद्योजक साक्षात्कारी झाले तर स्वतःच्या देशासाठी व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्यासाठी बरेच काही करू शकतील.

महालक्ष्मीच्या विविध मुद्रा आहेत. त्यांच्यापैकी एक अशी आहे की, आशिर्वाद देण्याच्या मुद्रेमध्ये ती आपला उजवा हात धरते. हा उजवा हात नामसांच्या सेवेत अथवा संरक्षणासाठी असलेल्यांना संरक्षण देतो. भारतात श्रीमंत लोक अतिशय वाईट आहेत असे दर्शविले जाते. परंतु प्रत्यक्षात तसे सर्वांच्या बाबतीत नसते. एखादा अतिशय गरीब माणूससुद्धा फार भयंकर असू शकतो श्रीमंत व गरीब यांच्यात योग्य तो समतोल व समजूतदारपणा असावा. काही काळानंतर, तुमच्या लक्षात येईल की लोक आर्थिक गरीबी वा श्रीमंती यांना विशेष महत्व देणार नाहीत तर आत्म्याची श्रीमंती व ईश्वराशी एकरूपत्व हेच सर्वात मोठे आशिर्वाद प्रत्येकासाठी असतील. अजूनही आपण परिश्रम करीतच आहोत. काही लोक भौतिकतेच्या मिजासीत मग्न असतील तर काही वेड्यासारखी काळजी करीत असतील. प्रगतिचा हा रथ आपण असाच भौतिक व अध्यात्मिक प्रगतीच्या मध्यमार्गावर ठेवला तर एक नवीन जग ज्यामध्ये पूर्ण सुसंवाद, शांती, आनंद, प्रेम आहेत असे आपण निर्माण करू शकू. व त्याचेसाठी प्रयत्न तुम्हीच सर्व करणार आहात. घोडे व रथ याच्याप्रमाणे ते आहे. घोडे हाकावे लागतात. सारथी स्वतः रथ ओढत नाही. त्याप्रमाणे तुम्ही आपली जबाबदारी लक्षात घ्यावी.

तुम्ही लक्षात घ्यावे की हे महान कार्य तुम्ही करीत आहात. संपूर्णत्वाशी संतुलन हवे. म्हणून संपूर्ण सुदृढतेचा विचार करायला हवा. मग विचार करावा की, ही सुदृढता विकसीत करण्याची क्षमता आपल्यात आहे. फक्त आपण ती जाणून घेऊन त्याचा विकास करायला हवा. आपण भौतिकातच अडकून त्याचा ऱ्हास करता कामा नये.

हे संपूर्णत्व काय आहे? या संपूर्णत्वात कोणालाही कोणती भिती नाही असे जग तयार करायचे आहे. या निरर्थक काळजीच्या मागे भिती आहे. श्री महालक्ष्मीच्या संरक्षणात तुम्ही भितीच्या पलीकडे आहात. पण तुम्हाला विश्वास ठेवायचा नसेल तर कोणीच तुम्हाला मदत करू शकत नाही. कारण हे सर्वच मिथ्या आहे. परमेश्वर तुमच्याबरोबर असल्याने प्रत्येक कार्य तुम्ही निर्भयतेने हाती घ्यायला हवे. तुम्ही फक्त प्रयत्न करा अहंकारातून प्रयत्न करता त्यावेळी भितीच्या सापळ्यात तुम्ही अडकता. अहंकारी लोक सर्वात अधीक घाबरट असतात. इतरांना ते घाबरवितात म्हणून त्यांना

वाटते की एक दिवस त्यांनाही कोणीतरी भिती दाखवेल. इंग्रज भारतात होते त्याकाळात भारतीय लोक त्यांना कमालीच घाबरायचे पण आता प्रत्येक इंग्रज कुटुंब दुसऱ्यास घाबरते, असे मला दिसते जेव्हा एक अहंकारी व्यक्ति दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविते तेव्हा स्वतः-लाच आरशात पाहिल्याप्रमाणे, त्या माणसाला वाटते की दुसरी व्यक्ति त्याच्यावर अधिकार गाजवेल. अशाप्रकारे आपल्या मनात भिती येते व आपण वेड्याप्रमाणे आरडा ओरडा करू लागतो. आपला अहंकारच भिती निर्माण करतो. निरहंकारी माणसाला भिती नसते. कारण त्याने इतरांना काहीच त्रास दिला नसतो. अशा स्त्रीची अथवा पुरुषाची परमेश्वर काळजी घेतो. मी तुमच्या हिताचे विषयी बोलत आहे. तुमचा सर्व शक्तिमान परमेश्वरावर विश्वास असेल तर तुमच्या मनातून भिती पूर्णपणे जायला हवी.

जेव्हा आपण म्हणतो भिती नसावी तेव्हा दुसऱ्या बाजूस अतिरेक होतो. मग आपल्याला हवे ते आपण करू शकतो. काही पण तयार करा. कोणालाही सांगण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला परमेश्वराची परवानगी घ्यायला हवी. त्यांच्या दरबारात जाऊन कळवावे लागते. पण तुम्हाला वाटते तुम्हीच परमेश्वर आहात पण तुम्ही नव्हेत. अशा प्रकारची लहरी वागणूक सहज योगासाठी, तुमच्या स्वतःसाठी आणि प्रत्येकासाठी फार धोकादायक आहे. मी एखादी गोष्ट सांगते त्यावेळी ९९ टक्के लोकांना असे समजते की ती त्यांच्या हिताची आहे. पण एक टक्का लोक त्यांना फार फार अहंकार असल्याने व स्वतःच्या हिताची ते काळजी करत नसल्यामुळे, प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्यांना हे समजत नाही की त्यांना मी जर काही सांगते आहे, तर ते त्यांना संपूर्णत्व देण्यासाठी आहे. पण याच्याउलट त्यांची प्रवृत्ति चुकीची असते हा दुसरा मूर्खपणा. तेव्हा अशा प्रकारची अनावश्यकपणे विनाशाच्या दुसऱ्या टोकापर्यंत जाणाऱ्या लोकांच्या संबंधी एक प्रकारचा तटस्थपणा ठेवायला हवा. तुमच्यात काय चुकीचे आहे, तुम्ही कोठे चुकीचे वागला ते मीच तुम्हाला सांगू शकते. दुसरे कोण सांगणार ? त्यानंतरच तुम्ही बदलू शकता ! ही प्रतिक्रियेची दुसरी पद्धत. अहंकारी लोकांना स्वतःचे त्यांच्या मुलांचे, देशाचे अथवा संपूर्ण जगाचे हित साधण्याची इच्छा नसते. स्वतःला विचारा की तुम्ही सहज योगात का आलात ? स्वतःच्या उन्नतिसाठी. पण उन्नती कशा करीता ? समजा आपण ट्यूब खराब आणली. त्या ट्यूबचा उजेड पडत नसेल तर ट्यूब कशाला आणायची ? तसेच तुम्ही प्रकाश देऊ शकत नसाल तर सहज योगात येण्याचा उपयोग काय ? तुमच्यातील प्रत्येक जण काही लहान व्यक्ति नाही. पण तुम्ही काय आहात ते तुम्ही लक्षात घेत नाही. तुमच्यावरील पूर्व-दूषीत संस्कारांच्यामुळे आपण निरुपयोगी आहोत असे तुम्हाला वाटते तुमच्या अंतरयामी संपूर्ण होत तुम्ही साधल्यास, त्याचा प्रत्यय तुम्हाला ताबडतोब बाहुयात जाणवेल.

तेव्हा स्वतःचे संपूर्ण हित साधण्याकडे चित्त द्यावे. लोक हा मुद्दा विसरतात व स्वतःमधील दोष शोधण्याचे ऐवजी दुसऱ्यांच्या मधील दोष पाहू लागतात. तुम्ही दुसऱ्यांकडे पाहिलेत, तरी परिणामी तुम्हाला त्याच्यातून काय मिळणार ? एखादा माणूस चुकत असेल व वाईट वागत असेल आणि तुमचे लक्ष तिकडे गेले, तर तुम्हाला ते समजेल पण तुमच्यात दोष आहे तर स्वतःला सुधारण्याचा तुम्हाला पूर्ण हक्क आहे व तुमच्याजवळ नियंत्रण आहे. दुसऱ्याचे दोष पहाणे हा भारतीयांचा विशेष गुण आहे. आपल्यात काय चूक आहे ते कधीही पहाणार नाहीत. इतरांचे दोष पहाण्यातच जर सतत चित्त गुंतले असेल तर आपण कसे सुधारणार ? याउलट तुम्ही दोषच पहात बसाल तर तुमच्यात अधीक दोष येतील. कोणी काही करीत असताना ते पहातात, मग म्हणतील श्रीमाताजी ती व्यक्ति सहज योगी आहे व असे करते ? पण कोण म्हणते ती व्यक्ति सहज योगी आहे ? हे स्वतःचे स्थान तुम्ही मिळविले आहे. कोणीही म्हणू शकते, मी सहज योगी आहे. आणि कोणी त्याला थांबवू शकत नाही. मी पाहिले आहे, काही वेडे लोक कित्येक वर्षे ते वेडे आहेत पण ते सहजयोगी म्हणवून घेतात. प्रत्येकाने 'मी सहजयोगी आहे की नाही ते स्वतःचे स्वतःमध्ये पहावे.'

'तुम्ही सहज संस्कृतिचे आचरण करायला हवे. सहज योगा-तील सर्वात महान संस्कृती म्हणजे एकमेकांच्यावर प्रेम करणे. एक सहज योगी दुसऱ्या सहज योग्यावर प्रेम करू शकत नसेल तर आपण सहज योगी असूच शकत नाही.

खोलवर जाण्याचा प्रयत्न करा व विचार करा आपण कोठे जन्माला आलो आहोत. जिथे प्रचंड कार्य होत आहे अशा युगात आपण जन्म घेतला आहे. आणि या युगाच्या विषयी लिहून ठेवले आहे. आपण या युगात जन्मलो आहोत, हे महान कार्य करणार आहोत. हे आपल्याकडून घटीत होत आहे. तर मग आपण काय करायला हवे ? चार जण एक टेबल उचलत आहेत व त्यांच्यातील एकाने सोडून दिले, तर टेबल पडेल. अथवा एका प्रचंड जहाजाला लहान छिद्र पडले, तर संपूर्ण जहाज बुडेल. कारण प्रत्येक गोष्ट एकत्र जोडली आहे. आपण सगळे एक आहोत ही भावना वाढेल तेव्हा मग अंगी नम्रता येईल. ख्रिस्त म्हणाले होते की, हृदयापासून जे नम्र आहेत, त्यांना पृथ्वीची मालकी मिळेल.

नितांत प्रेम, हा सर्वात महान सहज धर्म आहे. जिथे आपण सर्व एक आहोत अशा पायरीवर आपण पोहचलो आहोत. एखाद्या सहज योग्याच्या वा सहज योग्यांच्या ग्रुपच्या आठवणीने तुम्ही आनं-दाने भरून जायला हवे. आनंदाच्या सतत लहरी यायला हव्यात. कारण ते आनंद व शोतिच्या रुपात आहेत. हे मानले तरच आपण सहज योगी आहोत. तुमचे माझ्यावर प्रेम आहे हे मला माहिती आहे पण तुम्ही एक-दुसऱ्यांच्यावर प्रेम केल्याशिवाय मला कसे बरे वाटणार ?

तुमच्यामध्ये लक्ष्मी तत्वामधून महालक्ष्मी तत्व जागृत होते व तुम्हाला थोडे स्वार्थी वा आत्मकेंद्रित बनविते पण जेव्हा तुम्ही सर्वांच्या पलिकडे असलेल्या सर्व मर्यादांच्याही बाहेरच्या उच्च मूल्यांच्या क्षेत्रात जाता तेव्हा तुम्ही वैश्विक प्रेमाच्या शोधात असता. त्याचे मर्म असे असते की, तुम्ही प्रेम करता कारण ते आपलेच अविभाज्य घटक आहेत. आपण त्यांच्याशी एकरुप आहोत. महा-लक्ष्मीचे पुजन करणाऱ्यांना वाटले पाहिजे की कितीजण महालक्ष्मीची

पूजा करतात ती इतकी महान भावना आहे. महाराष्ट्रात एक सहज योगी दुसऱ्या जिल्ह्यात प्रचारासाठी जातो तेव्हा त्याचे आदरतिथ्य करण्याच्या ऐवजी तिथला लीडर त्याच्याशी भांडतो ! हे कसे होते? जेव्हा नामदेव पंजाबात गेले, त्यावेळी गुरुनानकांनी त्यांचा आदर केला आणि पंजाबी भाषेत सुद्धा लिहायला सांगितले. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व महान संतांच्या रचनांचा गुरुग्रंथसाहेबामध्ये समावेश केला आहे. कारण ते साक्षात्कारी, उच्च स्थितीला गेलेले जीव होते हे त्यांना ज्ञात होते. तुम्ही एकमेकांच्यावर प्रेम करावे याला मी फार महत्व देते. त्यामुळे मला माझ्या जीवनाचे सार्थक प्राप्त केल्याचा, महान आनंद मिळेल. एखादा माणूस फारच चुकीचे वागत असेल तर मला लिहून कळवा. व्हायब्रेशन्स मधून मला सर्व काही समजेल. मला कोणीही फसवू शकत नाही.

कोणाचे विमान चुकले तर काही बिघडले नाही तुम्ही इथे इतर सहज योग्यांच्याबरोबर रहा. तुम्ही समुद्रात असा वा विमानात कोठेही असा, तुम्ही सहज योग्यांच्याबरोबर आहात तर मग काळजी कशाला करायची ! लोक मला विचारतात, श्री माताजी तुम्ही एवढा प्रवास करता, तुम्ही थकत नाही ?

विचार असा पाहिजे, 'मी स्वतःवर करतो तसे प्रत्येकावर का प्रेम करू शकत नाही.' वैश्विक प्रेम तुम्हाला तो आत्मविश्वास व उच्च स्थिती देईल. संतांनी तुमच्यासाठी त्रास सहन केला. श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी का लिहिली ? त्यांना काय मिळाले ? त्यांचे वैश्विक प्रेम व्यक्त केल्याचे समाधान. मग तुम्हाला का मिळू नये ? महालक्ष्मी तत्व सतत प्रज्वलीत रहाण्यासाठी, तुम्ही प्रत्येक सहज योग्यावर प्रेम करता आदर करता.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद आहेत.

ॐ

# महाशिवरात्री

तुमचे पिता कोण ? तुमच्या माता कोण ? तुमचे पति कोण आहेत किंवा तुमची कोण पत्नी आहे ?

पण श्रीशिवांना याबाबत काहीच माहित नाही. त्यांच्याकरीता ते आणि त्यांची शक्ती या अलग असूच शकत नाहीत. म्हणून ते स्वत: म्हणजे एकमेव व्यक्तित्व आहे. तेथे द्वैत असूच शकत नाही. जेथे द्वैत असते तेव्हा तुम्ही म्हणता माझी पत्नी ! माझे नाक माझे कान ! माझे हात माझे माझे माझे असे म्हणत तुम्ही अगदी खोलात जाता.

जोपर्यंत तुम्ही ' माझे ' म्हणता तेव्हा तेथे द्वैत असते पण जेव्हा तुम्ही मी म्हणजे नाक असे समजता ' तेथे द्वैत संपते.' शिव हीच शक्ति, शक्ति हीच शिव, द्वैत नाहीच. पण आपण सतत द्वैतात राहतो व त्या कारणाने तुम्ही लिप्त होता. पण जेथे भिन्नता नाही तेथे लिप्त राहण्याचे कारणच काय ? जर तुम्हीच प्रकाश आहात, तुम्हीच दीप आहात तर मग भिन्नता कुठे ? तुम्हीच चद्र आहात, तुम्हीच चंद्रप्रकाश आहात तर द्वैत कोठे ? तुम्हीच सूर्य तुम्हीच सूर्य प्रकाश, तुम्हीच शब्द, तुम्हीच अर्थ तर द्वैत कोठे ?

म्हणून जेथे भिन्नता आहे, तेथे द्वैत आलेच आणि या अलगतेमुळे तुम्ही पाश निर्माण करता. पण जेव्हा तुम्हीच ते आहात तर तुम्ही त्याच्याशी बद्ध कसे ? हे मुद्दे तुम्ही लक्षात घेता का ? कारण तुम्ही आणि तुमचे यात अंतर व भिन्नता आहे. त्यामुळे त्याच्याशी तुम्ही बद्ध होता. परंतु ते मी आहे तर दुसरे कोण ? सर्व विश्व म्हणजेच मी, मग दुसरे कोण ? सर्व काही मी तर दुसरा कोण ? कोणी नाही.

हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुमचे आत्मतत्त्व तुमच्या मेंदूपर्यंत पोहोचते. आणि तुम्ही त्या विराटाचेच अंग प्रत्यंग होता. विराट हाच तुमचा मेंदू आहे हे मी तुम्हाला सांगितले आहे. समजा थोडासा रंग, अगदी थोडासा रंग समुद्रात सोडला तर तो पूर्ण विरून जातो. त्याचप्रमाणे आत्मा हा सागराप्रमाणे आहे ज्यात प्रकाश आहे आणि मेंदू रुपी पेल्यात हा सागर उतरला तर पेल्याचे मी पण रहात नाही व सर्व काही ईश्वर स्वरुप होते. सर्व काही, ज्याला तुम्ही स्पर्श करता त्यात ईश्वरीतत्त्व उतरते. वाळू सचेतन होते प्रदेश चेतनामय होतो, वातावरण चेतनामय होते, आकाशातील जीवही चैतन्यरुप होतात. सर्व काही दिव्य घडते. म्हणून जो सागर म्हणता तो आपला आत्मा आहे तर आपला मेंदू अत्यंत सिमीत आहे. तर अशा सिमीत मेंदूच्या पाशातून आपण मुक्त झाले पाहिजे. मेंदूच्या या सीमा तोडल्या पाहिजेत आणि जेव्हा हा सागर मेंदूपर्यंत पोहोचतो तेव्हा मेंदूचा हा कप फुटला पाहीजे आणि त्याच्यातील प्रत्येक अंश आकर्षित झाला पाहीजे सर्व वातावरण ज्याकडे तुम्ही तुमचे चित्त नेता ते सर्व चेतनामय रमणीय होते. आत्म्याचा रंग हाच त्याचा प्रकाश होय, हाच प्रकाश कृति करतो, कार्य करतो, विचार करतो समन्वय साधतो सर्वकाही करतो आणि याच कारणासाठी आज तुमचे आत्मतत्त्व तुमच्या मेंदूपर्यंत उन्नत करण्याचे योजले आहे.

मी तुमच्याबरोबर आहे म्हणून तसे पाहिले तर तुम्हाला पूजन कार्याची जरुरी नाही. तुम्हाला त्या स्थितीला जायचे आहे, आणि त्यासाठी पूजनाची जरुरी आहे. माझ्या कारकिर्दीतच अनेक लोक शिवस्वरूप होतील, अशी मला आशा आहे. त्यासाठी तुम्ही कष्ट करा असे मला म्हणायचे नाही.

या प्रकारच्या उत्थानामध्ये काहीच त्रास नाही. हीच आनंदाची स्थिती आहे; हे समजून घ्या. या समयी तुम्ही ' निरानंद ' होता. याच आनंदाला सहस्त्रावर नांव आहे. ' निरानंद ' तुम्हास ठाऊक आहे. तुमच्या आईचे नाव ' निरा ' आहे म्हणून तुम्ही निरानंद होता,

म्हणून आजच्या शिव पूजेला विशेष अर्थ आहे. आज एकंदरीत जे बाहयातून होते, स्थूलातून होते ते सूक्ष्मातही घटीत होईल. मी तुमच्या आत्म्याला तुमच्या मेंदूमध्ये (सहस्त्रारारावमध्ये) ढकलण्याचा प्रयत्न करते, पण ते कधी कधी कठीण वाटते कारण चित्त अजून अडकलेले आहे ते अलग करायचा प्रयत्न करा. राग, मोह, इर्षा सर्व काही कमी करा, त्यावर काबू करा. मला माहीत आहे काही लोक काही करणार नाहीत. हरकत नाही. मी ते तुम्हाला सांगेन. मदत करेन. तुम्ही सुद्धा प्रयत्न केला पाहिजे.

आज पासून सहजयोगाला विशेष गहनता येणार आहे. तुम्ही लोक त्या गहनतेपर्यंत पोहोचला पाहिजे. प्रत्येक जण त्याकरीता कुठल्या ह्याची किंवा उच्च शिक्षणाची आवश्यकता नाही. मुळीच नाही. काही लोक ध्यान करतात समर्पित होतात. गहनतेत उतरतात जशी काही झाडाची नविन मुळे खोलवर पसरतात. त्यामुळे दुसरे त्यांना अनुसरतात.

शिवतत्त्व हे निर्मळ, शुद्ध निष्कलंक आहे.

श्री माताजी

# श्री कुंडलिनी पूजा (सारांश)

दिनां २१ जून १९९२ रोजी कबेला येथे केलेलेभा पण-

आपण सर्वांनी जाणिवेच्या उच्च क्षेत्रात प्रवेश केला आहे त्यामुळे तुम्हाला काही शक्तिही प्राप्त झाल्या आहेत. आणि अध्यात्माच्या इतिहासात पूर्वी कोणालाही कुंडलिनी जागृतीची पूर्ण क्षमता नव्हती. ज्यांना जागृती मिळाली ते फार उजवीकडे पोहचले किंवा डावीकडे गेले. आणि ज्या काही शक्ति प्राप्त केल्या त्यांची दुसऱ्याच्या कल्याणाकरीता काहीच उपयोग नव्हता. श्री बुद्धांनी सांगितले की बुद्धाचा भविष्यातील अवतार म्हणजेच 'मात्रेय' किंवा तीन मतांची एकत्र शक्ति, ज्यावेळी होईल त्या वेळी ते सर्व लोकांना हित-कारक होईल; ही खूण सहज योग्याचीच नाहीतर लोकांची असेल. विपयी सर्व लोक 'बुद्ध' किंवा आत्मसाक्षातकारी होतील ज्यांना कुंडलिनी ज्ञान आहे. त्यांनी तिचा गैरवापर करून ज्यांना तिच्याविषयी अर्धवट ज्ञान होते ते 'मांत्रिक' झाले. तंत्र म्हणजे कुंडलीनीच कार्य आणि यंत्र म्हणजे कुंडलीनी स्वतः (मशिन)

कुंडलीनीचे पोषण कसे होते हे आपण शोधले पाहिजे. पहिल्या प्रथम तुम्ही (सहजयोग) लोक व इतर साक्षात्कारी लोक यात फरक आहे. प्रथम फरक म्हणजे हे तुम्हाला सहजतत मिळाले, इतरांना त्यासाठी हिमालयात जावे लागेल, थंडीत उभे रहावे लागेल, बरेच निवरतले, ह्यांना गुहेत राहून फळे किंवा काहीही न खाता रहावे लागेल. बुद्धाच्या वेळेसही त्या लोकांना गुहेत राहून फळे खाऊन किंवा काही न खाता, अंग झाकण्याकरीता एकच कपडा घालून गावा-तून भिक्षा मागून रहावे लागेल. कुठलाच आराम नाही एवढेच नाही तर त्या सर्व सुखांचा त्याने त्याग करायला शिकविले, पण कोणालाही (आत्मसाक्षात्कार) देता येत नव्हता. गुरु एकाच शिष्याचे कुंडलिनी जागृत करीत होता. फक्त एकालाच कुंडलीनीचे जागरण करता येत होते.

फरक एवढा आहे की तुम्ही तुमच्या शक्तिचा प्रत्यय देऊ शकता, दुसऱ्याला पार करू शकता, ठिक करू शकता दुसऱ्याचे चैतन्य समजू शकता. काही सहजयोग्याचा सूर्य, चंद्र, पाऊस या प्रमाणात काही ताबा आहे. काही नुसत्या प्रार्थनेतून काहीतरी प्राप्त करू शकतात. केवळ प्रार्थना करून त्यांनी अनेक लोकांचे प्राण वाचवीले ह्या शक्ति पूर्वीच्या ऋषी मुनींना अवगत होत्या पण त्यात करूणा किंवा दयेचा लवलेश नसे. पण तुमचे हे क्षेत्र विशेष आहे. त्यात लोकांच्या कल्याणाचा मार्ग आहे. पूर्वीचे लोक स्वतःचा बचाव करत वा विनाश घडवून आणीत लोकांना शाप देत. या शक्ति तुमच्यात नाहीत मी त्या तुम्हाला दिल्या नाहीत. कारण प्रेम, करूणा दया हा आपला पाया आहे ते लोक कोपीष्ठ होते व सामान्य लोकांबद्दल ते कठोरपणे बोलत. जरी काहींनी समाजाचा तिरस्कार केला नाही तरी ते आत्म-संतुष्ट असत वा स्वतःच्या शक्ति विषयीच लिहित.

तुम्ही आता नव्या क्षेत्रात आहात. तुमच्या शक्ति तुम्ही लोकांच्या उद्धाराकरिता वापरायच्या. तुमची कुंडलीनी सहज जागृत झाली केवळ तुमच्या आईच्या प्रेमामुळे, करूणेमुळे. हिच करूणा हेच प्रेम, तुमच्या कुंडलीनी शक्तिचे पोषण करणार आहे. पहिला शब्द प्रेम आहे. तुमच्यामध्ये निरागसता आली पाहिजे. ती नसेल, तुम्ही आसक्त असाल, वा तुमचे प्रेम एकाच व्यक्तीशी निगडीत राहील. कुंडलीनीचे तसे नाही. तीचे उत्थान होते पण एकाच चक्राशी ती अडकून रहात नाही कारण तिला तिच्या उत्थानाचा विचार आहे. अशा प्रकारे सहजयोग्यांनी कोठल्याही नात्या-गोत्यात अडकता कामा नये व हे शक्य आहे. तुम्हाला बुद्धांच्या अनुयायांन सारखे होणे जरूर नाही.

उदा. झाडातील रस वरवर जातो, झाडांच्या निरनिराळ्या शाखांना पोहचतो, आटून जातो किंवा परत येतो. हा मार्ग मोकळा असला पाहिजे त्यामुळे कुंडलीनीचे उत्थान बिनासायास होते. जेव्हा तुम्ही एकाच गोष्टीला चिकटून बसता तेव्हा हा मार्ग बंद होतो. काही लोक आपल्या माता, पित्यांच्या व कुटुंबाच्या समस्येत अडकतात. ही कृत्रीम बंधने आहेत. जेव्हा तुमच्यावर एखादी आपत्ती ओढवते तेव्हा या लोकांचा काय उपयोग ? उलट ते त्याचा फायदा घेतात. तुम्ही तुमच्या कुटुंबात धर्मात वा देशात अडकू नका. तुम्ही आता विश्वात्मक व्यक्ति (आहात) तुम्ही कुठल्याही कृत्रीम नात्यात संबंधीत नसुन आत्म्याने युक्त अशा नात्यात आहात. आणि हे अंतर्यामी स्थापिले पाहिजे. म्हणजेच आपल्या पतीचा त्याग करणे वा पत्नी व मुलांचा त्याग करणे असे नव्हे तर आपले भ्रम सुटले पाहिजेत.

असे मनोग्रह अनेक आहेत काही भ्रम चांगले वाटतीलही पण तेही सुटले पाहिजेत कारण ते भ्रम आहेत. आपण त्यावर ताबा मिळवीला पाहिजे. उदा. भारतीयांच्या बाबत, एक ग्रह असा आहे की, त्यांनी रोज सकाळी स्नान केले पाहिजे. पण असे नव्हे की आज जर मी आंघोळ केली नाही तर मी अस्वस्थ आहे असा मनोग्रह जरी चांगला असला तरी ती एक प्रकारे गुलामी आहे. तर चांगला किंवा

वाईट, मनोग्रह तो मनोग्रहच, हे जाणले पाहिजे. तसेच ते विरुद्ध दिशेलाही जाऊ नये म्हणजेच मी कधी अंघोळच करणार नाही. म्हणजेच याचा अर्थ असा की मला सकाळी स्नान नाही जमले तर संध्याकाळी करेन, फार तर एखादे दिवस होणार नाही. तुमच्यावर कशानाच ताबा असू नये तेव्हाच कुंडलीनीचे चलन होते कारण तुम्ही पूर्णपणे स्वतंत्र असता. तुमच्यात जे ग्रह निर्माण होतात ते तुमच्या कुटुंबापासून तुम्ही ख्रिश्चन म्हणून जन्मला असाल तर तुम्ही ख्रिस्ताशी निगडीत होता. तुम्ही हिंदू असाल तर गीतेशी किंवा वेदा-शिच संलग्न राहता. यामुळे असंतुलन येते आपली सर्व धर्मा-बाबत वा पंथाबाबत समानतेची दृष्टी असावी हेच संतांचे लक्षण आहे.

आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही इतर भोवतालच्या समाजापेक्षा एक उच्च स्थरावर जाता हे तुम्ही जाणता तुम्ही स्वतःला कोठल्याही एका देशाचे म्हणू शकत नाही. तुम्ही विश्वात्मक व्यक्ति आहात आणि तसे वागू लागता. वर्ण कसाही असेना या जगात त्यामुळे काही फरक पडत नाही हे तुम्ही जाणता. आपल्या पेक्षा कोणी अधिक सावळा किंवा गोरा असेल तर तुम्ही द्वेष करू लागता. एखाद्या धर्म-वेड्याला दुसऱ्या धर्माबद्दल विचारले तर तो धर्म एकदम टाकाऊ आहे व माझाच खरा धर्म आहे असे म्हणेल तुम्ही जर विश्वात्मक झालात तर आतून कल्पना निर्माण झाली पाहिजे की ईश्वराच्या कृपेने खऱ्या अर्थाने मी एका उच्च पातळीवर आहे. तुम्ही साक्षा-त्कारी आहात तुम्ही सर्व बदलले पाहिजे. तुम्ही ज्या गोष्टी सोडल्या त्यांशी निगडीत राहण्याचा काही उपयोग नाही. तुम्ही अंड्या पासून पक्षी झालात तर अंड्याशी चिकटून राहू नका.

अशा प्रकारे तुम्ही तुमची जागा स्विकारा व स्वतः विषयी आदर ठेवून आपण पूर्णपणे आता आत्मसाक्षात्कारी असून जाणले पाहिजे की आपल्या बदललेल्या जीवनाचा हेतू काय आहे ? जे आता पूर्णपणे बदलले आहे. तुम्हाला (आत्मसाक्षात्कार) मिळाला आहे तो जगाला देण्याकरिता आणि जगाला मुक्त करण्यारिता आहे. हे एकदा लक्षात आले की तुम्ही आपोआपच जबाबदारी उचलता आणि कुंड-लीनी ही वर जाईल. अशी माणसे होती की ती भाषण देण्यास घाब-रत वा त्यांना स्टेजवर बोलण्याची भीती वाटे, ती सुद्धा उत्तम भाषण देऊ लागली. काही गाऊ लागले तर काही काव्य करू लागले अशा सुंदर गोष्टी तुमच्यात प्रतित होऊ लागल्या, तुम्हाला लाभल्या हे तुम्ही स्विकारले पाहिजे. तर तुम्ही आता भीतीचे नाव सुद्धा घेऊ नका.

जे डाव्या बाजूचे आहेत त्यांनी आता आपण प्रकाशमान आत्मा आहोत आणि आपल्याला कोणी त्रास देऊ शकत नाही किंवा ऱ्हास करणार नाही हें लक्षात घ्यावे. जे घडत जाईल त्याचा तुम्ही आनंद उपभोगाल. 'विनाश काले विपरीत बुध्दी ' या संस्कृत म्हणीप्रमाणे स्वतःचा इतर लोक नाश ओढवून घेतील. ते आपल्या कुबुध्दीमुळे नाश पावतील. त्याकरिता तुम्हाला विनाश शक्ति वापरण्याची जरूरी नाही. सर्व सर्वव्यापी ईश्वरी शक्ति घडविते. तुम्ही फक्त त्या माण-साला क्षमा करा. तुमची जबाबदारी त्यामुळे संपते व मग कुंडली-नीचा मार्ग मोकळा होतो. त्याच्या बद्दल तुम्ही कोठलाही द्वेष किंवा किंतू न बाळगता त्याच्या मूर्खपणाला तुम्ही फक्त हसा. सहजयोगां-तील ही गंमत तुम्ही ओळखा. मग हे लोक असे विदुषकासारखे का वागतात ते समजेल. तुम्ही कोणाविषयी भिती कधी ठेवू नका.

तुम्ही साक्षात्कारी जीव असून सत्य पाहिले आहे व तुम्ही प्रकाशमान आहात तर लोक तुम्हाला विरोध करणारच सर्व संतांना त्रास झालेला आहेच पण यापुढे तुम्हाला असा त्रास होणार नाही पण अशा गमतीची तुम्ही मजा लुटा. या दृष्टीकोणामुळे तुमची भीती वा डाव्या बाजूचे दोष नाहीसे होतील. मग या तांत्रिकाची, बाधांची व भूतांची कसली चिंता ? तुम्ही शक्तिमान आहात भित्रे व्हाल तर तुमची कुंडलिनी वर जाणार नाही. कारण जे लोक भित्रे आहेत त्यांची कुंडलिनीवर चढत नाही. लोकांना आधाराची भीती वाटते व त्यांच्यावर कोणी हल्ला करील असे वाटते पण खरा सहजयोगी कशालाच भित नाही. कारण त्याला ठाऊक आहे की गण व देवदूत त्याचेबरोबर आहेत. त्याला कोणी हात लावू शकणार नाही. ही भीती दूर गेली की तुमच्यातील कपट, कावेबाज वृत्ती व द्वेषबुद्धी निघून जाईल. या सर्वांमुळे कुंडलिनीचे उत्थापन व्यवस्थित होईल.

दुसरे महत्वाचे, कुंडलिनीला अडथळा येण्याचे कारण तुमचा 'अहंकार.' हा भयंकर आहे. तुम्ही जर ख्रिस्ताचे अनुकरण करता तर तुमच्यात अहंकार कसा येतो ? क्षमा वृत्तीही सहजच यावी. रागाचा लवलेशही नसावा कारण तुम्ही शक्तिमान आहात. आज्ञेवरील पकड म्हणजेच तुम्ही स्वतःलाच इजा ओढविता. यकृतातून उगम पावणारा क्रोध तुमच्या आज्ञेत प्रवेशतो व अडकतो. याकडे लक्ष दिले पाहिजे. सर्व पाश्चात्य संस्कृतीच्या दोन समस्या आहेत. पहिली संग्रह व हावरी वृत्ती. हाव वाढली, यंत्रे फिरू लागली. प्लॅस्टिकचे उद्योग धंदे वाढले आणि मग पर्यावरणावर चर्चा सत्रे. पूर्व काळात याच देशांनी कला वाढविली. कलाकार निर्माण केले व त्यांना आश्रय दिला.

भारतात सुद्धा पूर्वीच्या कलाकारांना राजाश्रय मिळे मोझा-र्टला राणीसमोर कला सादर करण्याचे आमंत्रण मिळे. सरकारे नुसती कर वसूलीच करत नसत तर ते कलाकारांची, संगितकारांची, चित्र-कारांची व सर्व कलाकारांची कदर करीत. जे वाढवायचे ते कलेच्या वर्धापनासाठी. पण त्यात प्लॅस्टिकची कृत्रीमता नको. हाताने बन-विलेल्या वस्तू विकत घेतल्या पाहिजेत. संगीतातही जे सखोल, शास्त्रीय जे ईश्वराची स्तुती गाते त्याची आवड ठेवा. जे उथळ आहे, जे तुम्हाला वेडेपीसे बनविते. उत्तानतेकडे नेते असे संगीत ऐकू नका.

जे लोक नशेत (ड्रग्ज घेणारे) गुंततात ते अगुरुकडे गेलेले असतात योग्य किंवा अयोग्य याचे त्यांना तारतम्य नसते. पश्चिमेत हा अहंकार टप्याटप्याने वाढत जाऊन वाईट स्थितीत गेला. हा सगळा 'पाहिजे पाहिजेचा' परिणाम. एखाद्याची पत्नी सुंदर असेल तर प्रत्येकाला तिच्याकडे पाहण्याचा. अधिकार व एखादीचा पती देखणा असेल तर इतर बायकांना त्याच्याकडे पाहण्याचा जो तुमचा नवरा नाही त्याच्याकडे बघून तुम्हाला काय मिळेल ? सगळी नीतीमत्ता बिघडून गेली. आपल्या वयाचा विचार करण्याची कुवत नाही, कले-चाही विपर्यास झाला. सर्व काही मर्यादेच्या पलीकडे गेले अशी

पाश्च्यात समाजाची स्थिती झाली. कुंडलिनी स्वतःच्या मर्यादेतच वर चढते उलट तुम्हाला तुमच्या मर्यादेत ठेवते. तुम्ही मानव आहात. तुम्ही प्राण्याप्रमाणे वागू नका. ईश्वराने तुम्हाला निर्माण केले ते निम्नस्तरावर जाण्यासाठी नाही तर तुम्ही उच्च मानवस्थितीला प्राप्त व्हावे म्हणून.

हव्यासाचा दुसरा भाग म्हणजे एकाने दुसऱ्यावर आक्रमण करणे जणू हा त्याचा हक्कच आहे. ज्यांचे आमच्या देशावर ३०० वर्षे वर्चस्व होते. त्यांनी भौतिक गोष्टींसाठी आमच्यावर आक्रमण केले. आमच्याकडील आध्यात्मिक एकही गोष्ट घेतली नाही. जपानी लोकांनी त्याचेच अनुकरण केले ही आक्रमक वृत्ती सर्व समाजाला विनाशाकडे वळविते. उदा. मारामाऱ्या, युद्धे. तिसऱ्या जगालाही या आक्रमणाने भेडून टाकले. पण कुंडलिनी या वृत्तीला नष्ट करून तुम्हाला आनंद देते. तुम्ही सगळ्यातून आनंद घेता. आत्मगुण शोधत तुम्हाला आनंद प्राप्त होतो. या आनंदात तुम्हाला दुसरे काहीच जरूर लागत नाही. लहान गोष्टीत सुद्धा तुम्हाला आनंद दिसला पाहिजे. त्यांना वाटते आपण आक्रमक होवू शकतो वा कोणाच्याही पत्नीला वा मुलाला पळवू शकतो. या वृत्तीमुळे त्यांच्यातील करुणा, प्रेमच संपते. यामुळे हे माझेच अशी वृत्ती वाढते हे माझेमुळे माझा देश. माझा देश असे कसे म्हणू शकता ? तुम्ही साधे फुल सुद्धा निर्माण करू शकत नाही. ते ईश्वराचे आहे. त्याने निर्माण केले. काही सहज-योग्यातही हा 'माझेपणा' आहे. ज्याचे हृदय विशाल आहे. सर्व विश्व हे त्याचे आहे असे वाटते असा अनुभव तुम्ही हृदयात घेता तेव्हा कुंडलिनी एकदम सहस्त्रावर झेपावते (हृदयस्थान सहस्त्रावर आहे) सहस्त्रावर पकड घेण्याचा प्रश्नच नाही. सहस्त्रावर उघडे राहण्यासाठी माझे कोणी नाही ही वृत्ती, हा शहाणपणा बाळगणे जरूर आहे. सर्व ईश्वराचीच आहेत. परमेश्वराला जे वाटते ते त्याला करू द्या. तर या क्षुल्लक गोष्टींच्या पलीकडे जा मी सहजयोगींना पाहिले. ते आपल्या कुटुंबाशीच संलग्न राहतात.

प्रत्येकजण तुमचाच आहे. सहज योग्यांची कुंडलिनी ही प्रेमामुळे निर्माण झाली आहे. शुद्ध प्रेमाला शुद्ध प्रेम करण्याचीच शुद्ध इच्छा होते. सर्वांवर सारखे प्रेम करावे. जेव्हा तुम्हाला हे कठीण वाटते म्हणजेच तुम्ही त्या क्षेत्रात अजून पोहोचला नाही. तुमचे हृदय मोठे करा. तुम्हाला कधीही चुकल्यासारखे वाटणार नाही. सबबी सांगू नका किंवा वाद करू नका किंवा बुद्धी चालवू नका (काही वाचून) तर तुमचे हृदय ओता म्हणजे एखाद्याला (निर्व्याज) प्रेम देणे या शिवाय दुसरे काही महत्त्वाचे असूच शकत नाही. सर्वांवर सारखे प्रेम करणे ही एक उच्च पातळी आहे. जे काही कोणाला सांगायचे ते प्रेमाच्या भाषेत.

कुंडलिनी ही निर्व्याज आहे ती कसली भरपाई मागत नाही. करुणामय, मुलायम असा आपल्या निर्मिलेल्या या प्रेमाचा झरा (कुंडलिनीचा) ही आपली शक्ती तशीच वाहू द्या कारण तिने दिलेला हा साक्षात्कार हा स्वतःच्या उद्धाराबरोबर सर्व जगाच्या करता आहे प्रत्येकाने दुसऱ्याला साक्षात्कार दिला पाहिजे नाहीतर त्यांची कुंड-लिनी तेथेच राहणार (निद्रीस्त) सहजयोग हा काही वेळा पुरता नाही. तो सतत तुमच्याबरोबर असून जेव्हा संधी मिळेल तेव्हा तुम्ही सहजयोगावर सांगितले पाहिजे. तुम्ही लोकांना जमवले पाहिजे. आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे.

परमेश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.

० ० ०

# श्री विष्णू माया पूजा (सारांश)

शांती पेनिसिल्व्हीया अमेरिका १९ सप्टेंबर ९२

आज आपण विष्णुमाया पूजा करण्याचे ठरविले आहे. तर ही विष्णु माया कोण ? अमेरिका हा श्रीकृष्णाचा देश आहे ते कुबेर (संपत्ती) आहेत तसेच यम (मृत्यू) आहेत. ते कुबेर आहेत म्हणून इतर कोठल्याही देशापेक्षा तिथे लोक श्रीमंत आहेत. पण तुम्हाला संतुलन असले पाहिजे कारण महालक्ष्मी ही कृष्णाची शक्ति आहे. तेथे मुमुक्षु वृत्तीला महत्व आहे. महालक्ष्मी तत्त्व अमेरिकेत कार्यान्वित झाले पण लोकांना कोठल्या मार्गाने जावे याचे तारतम्य राहिले नाही. आणि खूप लोक खोटया आश्वासनांनी व जाहिरातींनी वाहून गेले. जेव्हा मुमुक्षु वृत्ती दिसू लागली अशा वेळी श्री माताजी अमेरिकनांना इशारा देण्यासाठी आल्या होत्या कारण त्यांच्या लक्षात आले की जगातील गुरुंना अमेरिका ही एक उत्तम बाजारपेठ आहे म्हणून जगातील इतर ठिकाणचे बावा अमेरिकेकडे धाव घेतील हे पक्के पण कोणी ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. या गुरुंनी अमेरिकन लोकांची कमजोरी ओळखली, त्यांच्या अहंकाराचे फाजील गुणगान गात अगदी साध्या उथळ गोष्टी सांगितल्या. उदा. तीन फुटावरून उडण्याची क्षमता मिळेल. या कल्पनेने सगळे भारावून गेले. हे त्यांना काहीतरी विशेष वेगळे वाटले. जरी काही लोक पैशाच्या मागे होते व 'सत्याच्या शोधात असले तरी सत्यासाठी पैशाची आवश्यकता नसते हे जाणण्या इतपत त्यांचे महालक्ष्मी तत्त्व नव्हते व या सर्व अगुरूंच्या जाळ्यामध्ये ते होते. आता या वर्षी पहिल्यांदा सर्व काही सुखात होणार असे वाटते.

पण विशुद्धीचे एक महत्त्वाचे चक्र आहे ते डावी विशुद्धी आणि हे चक्र पकडले तर तुम्हाला अन्जायना, स्पॉडिलायटीस व शिथील इंद्रिये हे रोग जडतात डावी विशुद्धी पाश्चात्यांच्या बाबतीत एक फॅशन झाली कारण ख्रिस्ती धर्मात आपण कबूल करतो की मी पापी आहे. नव्हे जन्मतःच पापी आहे. म्हणजेच तुम्हावर पापाचा ठसा येता तुम्ही स्वतःला दोषी म्हणवून घेऊ लागता आणि या दोषांच्या भावनेने तुमची डावी विशुद्धी धरते.

अमेरिकेच्या लोकांना आज सुध्दा आपण जास्त दोषी आहोत अशी भावना आहे. हा त्यांचा एक मोठा दोष आहे. साध्या गोष्टीत सुध्दा दोषी समजतात कारण त्यांना बिलकुल आत्मविश्वास नाही. जरी ते उध्दट व दिखावटीपणा करणारे असले तरी त्यांना वाटते आपले राष्ट्र हे लहान आहे, त्याला काही परंपरा नाहीत त्यांना इंग्लीश व फ्रेंच लोकात कृत्रीमता दिसते तर (अशियाई) भारतीय मागासलेले वाटतात. पण त्यामुळे ते भलतीकडेच वहावत जाऊन आपला रस्ताच चुकले, सगळं काही फिसकटले आणि त्यामुळे त्यांची डावी बाजू विशुध्दी भयंकर बाधली.

या चक्रावर पकड तेव्हा येते जेव्हा तुम्ही तुमच्या चुकांना सामोरे जाऊ शकत नाही. जर मी चुक केली असेल तर ठीक आहे की कबूल करतो आणि याच्यापुढे ती होणार नाही तीला सामोरे जा. हे त्यांना नको आहे. त्यांना स्वतःला दोषी वाटते ती तिकडेच जमा होणार (डाव्या विशुध्दीकडे) अशा प्रकारे दोषांचे काळे ढग जमा करतात आणि मग जी विष्णुमाया वीज म्हणून आहे ती या ढगांच्या संघर्षातून बाहेर पडते. त्यामुळे पाऊस पडतो. या लोकांवर ती कार्यान्वित होते. त्यांना एक धक्का बसतो. ते संवेदनाक्षम होतात मग ते निराश होऊन विचारतात. 'आम्ही निराश का आहात ?' काय समस्या आहे ? आणि या विष्णुमायेच्या शक्तिने त्यांचे दोष उघड होतात.

विष्णु मायेचा उगम तसा लक्षणीय आहे. विष्णू माया ही श्री कृष्णाची बहीण असून तिचा जन्म श्रीकृष्णाच्या जन्मानंतर झाला. प्रत्यक्ष ती त्याची स्वतःची बहीण नव्हती पण ती नंद व यशोदा यांची कन्या होती. पण कृष्णाला पर्याय म्हणून तिला ठेवण्यात आले. कंसाला सांगण्यात आले ते आठवे अपत्य आहे पण ती मुलगी असल्यामुळे ती त्याच्या हातून आकाशात फेकली गेली आणि तिने जाहिर केले की श्रीकृष्णाने अवतार घेतला आहे आणि तो तुझा वध करणार. तर ती अवतरण जाहीर करते आणि शुभघटना सुचविते. एवढेच नाही तर ती वाईट गोष्टींना भस्मसात करते.

महाभारताच्या पर्वकाळात ती द्रोपदी म्हणून जन्मली तिचे वस्त्रहरण करण्याचा दुर्योधनाने प्रयत्न केला तेव्हा श्रीकृष्णाचा तिने धावा केला व तो सर्व तयारीनिशी द्वारकेहून तिच्या रक्षणार्थ धावला साडया फेडत। फेडता दुर्योधन पार थकला व शेवटी मूर्च्छित होऊन पडला. म्हणून विष्णुमाया ही कुमारी असून ती सर्व पंचमहाभूतात व्याप्त आहे हे पाच पांडवांच्या बरोबर तिच्या विवाहाच्या वेळेस दिसून आले. या तिच्या कौमार्य शक्तीने कौरवांची पापे तिने उघडी

पाडली, जे राज्य मिळवू इच्छित होते आणि धर्माचा नाश करू पहात होते. ती आग्रह धरून सांगते की तुम्ही युध्द करा. काही झाले तरी धर्म प्रस्थापण्यासाठी युध्द करा.

भाऊ म्हणून श्रीकृष्णाने तिचा संभाळ केला. म्हणून भारतात भाऊ बहीणीच्या नात्याला फार महत्त्व आहे. आणि सहजयोगात सुध्दा त्यासाठी रक्षाबंधन व भाऊबीज करतात म्हणून रक्षाबंधनात आम्ही भावांना राखी बांधतो. ही राखी म्हणजे विष्णूमाया शक्तीने भावाचे रक्षण करणे.

तर भाऊ बहिणीचे हे नाते म्हणजे जाणीवेने समवयस्कतेचे रक्षणात्मक, शुद्ध प्रेमाचेच द्योतक आहे. हेच विष्णूमायेचे कार्य आहे.

थोडेसे खोलात जाऊन विचार केला तर विशुध्दी म्हणजे पाश्चात्यांत सतत दोष लावून घेण्याची व त्यापासून दूर जाण्याची वृत्ती अगदी क्षुल्लक गोष्टीत सुध्दा. कारण पाश्चात्य संस्कृतीत शिस्त काटेकोरपणा उदा. चमचा टेबलावर विरुध्द बाजूला ठेवला किंवा चुकून थोडी कॉफी सांडली तरी तुम्ही अपराधी समजता ही दोषी वृत्ती एवढी वाढली की स्वतःला ठीक न करता 'मी अपराधी' अपराधी ही जाणीव वाढून जीवनातील सूक्ष्मता निघून जाते. सहजयोगात स्वतःला दोष लावणे म्हणजे तुमची डावी बाजू पकडते. तिचा सेंट्रल नर्व्हस सिस्टिमशी (नस) संबंध असलेमुळे ज्याच्यावर हा दोष पकडला त्यामुळे तुम्हाला हातावर चैतन्य जाणवत नाही. त्या नसेला तो चेपतो त्यामुळे डावीकडे काहीच जाणवत नाही. डावीकडील ही पकड तेव्हाच जाणवू लागते ज्यावेळी तिचे एका व्याधीत रूपांतर होते.

अगदी खोलात पाहिले तर विष्णूमाया जी आहे ती फक्त सत्य जाणते. जेव्हा ती चमकू लागते तेव्हा सर्व काही स्वच्छ दिसते. जेव्हा ती तुमच्यावर कार्यान्वित होते तेव्हा सत्य उघडे करते. तुमची डावी विशुध्दी अधीक वाढली तर ती निघून जाते. मग ती तुम्हाला ठीक करण्याकरता वा सहाय्य करण्यासाठी वा उघडे पाडण्यासाठी नाही. मग तुम्हाला डावीकडे काहीच जाणवत नाही. बाजू बधीर होते, आणि सर्व व्याधींना मुक्त वाट मिळते. आणि याच प्रमुख कारणामुळे पाश्चिमात्य देशात भारतापेक्षा डावीकडील व्याधी असलेले जास्त लोक सापडतात.

म्हणूनच दोष लावून घेणे चूक तर आहेच पण ते भ्रामक आहे तुम्ही एखाद्या गोष्टीचा दोष लावून घेता तर त्याचा काय उपयोग आहे ? ते निरर्थक आहे. एखादी रिकामी गोष्ट वाहून नेणे आहे म्हणून एखादी चूक घडली असे तुम्हाला वाटले तर तिला सामोरे जा व पुन्हा करणार नाही असे म्हणा. जर तुम्ही स्वतः दोषी समजला तर तीच चूक पुन्हः पुन्हा करता. पुढे ती इतकी अंगी बाणते की चूक झाल्याची जाणीवच होत नाही. आणि पुढे लक्षात न येता चुका घडत राहतात. मग तुम्ही ठासून म्हणता मग त्यात काय चुकलं ? कारण त्यांना कबूल करायचे नसते व ते उध्दटपणात परिवर्तीत होते. पण उध्दटपणाच्या बुडाशी असतो दोषीपणा अमेरिकन लोक सामूहिक आहेत, म्हणजे जगात जे घडते त्याची चिंता त्यांना असते पण दोषीपणाची वृत्ती त्यांना संवेदना विरहित करते व सत्यापासून दूर नेते. उदा. ते एखाद्या जुलमी देशाची बाजू घेतील पण कोणी येवून असे म्हणणार नाही की ही आमची चुकी आहे आणि ते थांबले पाहिजे.

आता, 'हे फारच आहे,' 'माझ्याकरीता जास्तच आहे.' या वृत्तीने ते काही करतात व ते पूर्ण उजवीकडे झुकतात त्यातून निरनिराळ्या यंत्रे व शस्त्रांची निर्मिती करतात. पण शास्त्र निष्कर्षाप्रत जात नाही आणि ते तुम्हाला पूर्णत्वाकडे वा सत्याकडे नेऊ शकत नाही. म्हणून विष्णूमाया आपली शक्ती प्रकट करते. ती अशा गोष्टी प्रगट करते की लोक पाबरून जातात. ती कोठल्याही तत्त्वात प्रवेश करू शकते. तीने जर जल तत्त्वात प्रवेश केला तर मोठे वादळ निर्माण करील. ती काहीही घडवू शकते. ती जेव्हा कोठल्याही तत्त्वात प्रवेशते तेव्हा ती संप्रेरक (कॅटलिस्ट) होते.

आज ही विष्णूमायेची पूजा तुम्ही ठेवली. त्याबद्दल मला आनंद होतो आणि ती अशी शक्ती आहे की सहजयोग्यांनी तिच्यावर स्वार झाले पाहिजे. तुम्ही तिचे स्वप्न करू शकता कारण ती तुम्हाला तेथे पाहते तुमची काळजी घेते व जिवन सुरचित करते.

पैसा सर्वकाही नाही हे अमेरीकन लोकांना पटवून देणे कठीण आहे. अडचण अशी आहे की लोक इतके पैशाच्या व्यसनाधीन झाले आहेत की संपुर्ण जीवन-मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला आहे त्यामुळे ज्या कशाने पैसा शकतो, त्याच्यातच ते गुरफटून जातात. म्हणून मानवाच्यासाठी मूलभूत असलेले, आधारभूत असलेले पावित्र्य नाहीसे झाले. जेव्हा तुम्ही विष्णू-मायेच्या कौमार्याचा अपमान करता तेव्हा परिणामी त्यांच्या मायेचा, अर्थात खेळाचा प्रादुर्भाव म्हणजे एड्स् होतो, इतर सर्व प्रकार ज्याला गुप्त रोग म्हणता येईल अशा प्रकारचे दुर्धर रोग होतात.

विष्णूमाया कुमारी आहे ती पावित्र्याचा आदर करते. हे पावित्र्य स्त्रियांपुरतेच नाही पण जे पुरुष पावित्र्याचा नितीमत्तेचा अनादर करतात त्यांची सुद्धा ही समाचार घेते. सिनेमा व इतर दूषीत गोष्टीमुळे लॉस एंजिलीस धोक्यात आले याबद्दल मला बिलकूल आश्चर्य वाटत नाही. पण येथे सहजयोग रुजू लागला त्यामुळे या गोष्टी कदाचित टळतील. पण अजून धोका आहेच कारण विष्णूमाया ही शक्ती तुम्हाला भ्रमात वा मायेत ओढू शकते. ती माया दूर करू शकते किंवा काहीही भस्मसात करू शकते.

विष्णूमाया ही तुम्हाला मार्गावर आणते. जर अपराधीपणाच्या नावाखाली दोषांवर व चुकांवर तुम्ही पांघरूण घातले तर त्या वैयक्तिक, सामुहीक राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय पातळीवर असो, चुका उघड्या होतात. कारण कोणत्याही गोष्टीत ती प्रवेश करू शकते.

नैसर्गिक आपत्तीही विष्णूमाया निर्माण करू शकते आणि हे हादरे बसून सुद्धा त्यांचा संबंध आपल्या चुकांशी लावतात. व त्यांना सामोरे न जाता व दूर न करता त्या आपल्या डाव्या विशुद्धीत जतन करून ठेवतात.

म्हणून जेव्हा डावी विशुद्धी बिघडते त्यावेळी हंस चक्रावर परिणाम होऊन तुमचे तारतम्य गमावीले जाते. आणि मग कोठली गोष्ट विधायक आहे की मारक आहे. हेच समजत नाही. आणि मग

तुम्ही बाधक बाबींचा स्विकार करता कारण तुमची डावी विशुद्धी बिघडलेली असते. मग हात वर करता व मग त्यात काय बिघडले? त्यामुळे हिंसाचार, लाच खोरी, फसवणूक या वृत्ती बळावल्या अशा वेळी जेव्हा आपले काही चूक नाही असे वाटते आणि अशा कठीण परिस्थितीतून बाहेर पडायचे असेल तर तुम्ही पूर्ण श्रद्धेने सहजयोगाचा मार्ग स्विकारा डाव्या विशुद्धीचा त्रास कमी करण्यासाठी हाच एक पर्याय आहे. पण मी जर तुम्हाला काही सांगितले तर तुम्हाला त्यात दोषी वाटायला लागते. तुम्ही जे काही केले ते तर संपले. आणि तुम्हाला क्षमा करण्यात आली आहे. नाहीतर तुम्ही विष्णूमायेच्या तावडीत जाल.

उजव्या बाजूचे लोक जे रागीट, वर्चस्व गाजवतात व इतरांना ताब्यात ठेवतात. त्याचे वैशिष्टच असे की ते डावी विशुद्धी स्वच्छ करण्याऐवजी आपले दोष डाव्या विशुद्धीवर साठवितात. मी नेहमी सांगते की ही अहंकाराचीच अवांतर निर्मिती आहे. अपराधीपणा या प्रकारे तुम्ही स्वतःलाच नाहीतर दुसऱ्याला इजा पोहोचवता. विष्णूमाया दोन गोष्टीमुळे बाधीत होते, एक धूम्रपान व दुसरे लोकांना ठाऊक नाही, ते म्हणजे मंत्र.

विष्णूमायेकडून मंत्राना शक्ती प्राप्त होते आणि ईश्वरी शक्तीशी तुमचा संबंध जोडला न जाता तुम्ही मंत्र उच्चारले तर शॉर्ट सर्कीट होऊन तुम्हाला घशाचे त्रास, इतर अनेक त्रास होतात. कारण श्रीकृष्ण व विष्णू हे एकच आहेत. तुम्ही विराटाच्या स्थानाच्या समस्येतही अडकता.

काही लोक आपली चूक झाकण्यासाठी उदारपणा दाखवितात अशा तऱ्हेने चुका झाकण्याचा राजमार्ग तुम्हाला चुकीच्या ठिकाणी नेईल. हे विष्णू मायेला चालत नाही. कारण ती तुम्हाला पूर्णपणे जाणते आणि तुम्ही अनेक क्लृप्त्या लढविल्या तर ती आपली शक्ती प्रकट करेलच.

तर डावीकडच्या समस्या विष्णू मायेशी संबंधीत असतात, ती तुम्हाला शिक्षा करेल, उघडे पाडेल तशीच ती तुम्हाला देईल व मार्गावर आणेल. या सर्व शक्ती लक्षात घेऊन आज आपण विष्णू मायेचे पूजन करणार आहोत. अमेरिकन्स जे स्वतःला दोषी समजतात. त्यांनी हृदयापासून शपथ घेतली पाहिजे. 'माताजी मी निर्दोष आहे.' एवढ्या उच्चारणाने सुद्धा तिला प्रसन्नता वाटेल. तुम्ही स्वतःकडे दोष घेणार नाहीत, तुम्ही चुका करणार नाहीत आणि जे काही होईल त्या चा दोष तुमच्याकडे घेणार नाही. जर तुम्ही चूक केली तर ती तुमच्या डोक्यावर असेल. ती तुमच्या डाव्या विशुद्धीवर नसणार आणि जर तेथे (सहस्त्रारावर) थोडी जागा असेल तर तेथे तुमच्या चुकीच्या कृत्याचा दोष ठेवला तर त्याची तुम्हाला काळजी करण्याचे कारण नाही.

या अमेरिकेच्या भेटीमुळे मला खूपच आनंद वाटतो, आणि या वेळी निश्चितच सर्व ठिकाणी कार्यसिद्धी झाली.

पाश्चात्य लोकांनी 'हे निसर्गदेवा माझा काहीच दोष नाही.' असा मंत्र म्हटला पाहिजे. तुम्ही निसर्गाविरुद्ध जाऊन चुका करणार नाहीत त्यामुळे निसर्गाविषयीच्या समस्या सुटतील, सुधारतील. आपल्या बऱ्याच समस्या सुटतील जर तुम्ही त्यांना धीटपणे सामोरे जाऊन त्या दुरुस्त कराल. स्वतःचा धिःकार करण्याची, मानभंग करण्याची वा कमी लेखण्याची जरूरी नाही. स्वतःपासून स्वतःला अलग पहा जसे आरशात पाहून बोलला. तुम्ही नदीकडे जा, समुद्राकडे जा आणि म्हणा पहा ही चूक मी केली आणि परत ती करणार नाही. तुम्ही या तत्वांना अश्वासन द्या. कारण विष्णूमाया या तत्त्वांना छेदू शकते. तिच्यापर्यंत हा संदेश पोहोचेल, मग ती या तत्वात प्रवेश करणार नाही व तुम्हाला त्रास देणार नाही.

तुम्ही समुद्रावर जा आणि सांगा. अमेरिका दोषी नाही त्याने जे काही केले त्याकरिता हे जर सहजयोग्यांनी केले तर विष्णू मायेला पटेल कारण सहजयोग्यांचे जेनेटिक्स बदलले आहे. कलीयुग आणि सत्ययुगाच्यामध्ये येणाऱ्या या विशेष त्रेता युगात आपण ज्या चुका केल्या त्याची भरपाई दिली पाहिजे. केवळ दाब पकडून कार्य होणार नाही. तर त्यासाठी आत्मसाक्षात्कार घेतला पाहिजे त्यातून जेनेटिक्स बदलेल आणि निसर्गाकडे जाऊन सांगू शकता. आम्ही निर्दोष आहोत आम्हाला आमचा निसर्ग मिळाला. आम्हाला आत्म साक्षात्कार लाभला आणि मग सर्व ठीक होईल. मला खात्री आहे की या देशावरील संकटे टळतील, तुम्हा सर्व सहजयोग्यां करवी.

ईश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.

० ० ०

# श्री एकादशरूद्र पुजा, इटाली

परमपूज्य श्रीमाताजींच्या भाषणाचा सारांश

रुद्र ही शिवांची, आत्म्याची संहारक शक्ति होय, आता क्षमा शीलता ही त्यांची एक शक्ति आहे. त्यांचा स्वभाव आहे. ते आपल्याला क्षमा करतात कारण आपण मानव आहोत, आपण चुका करतो, आपण चुकीच्या गोष्टी करतो. आपल्याला मोह पडतो, आपले चित्त विचलीत होते, म्हणून ते आपल्याला क्षमा करतात. आपण आपले पावित्र्य बिघडवितो. अनैतिक गोष्टी करतो, चोऱ्या करतो, ईश्वराच्या विरोधात वागतो, ईश्वराच्या विरोधात बोलतो, तरी ते आपल्याला क्षमा करतात. आपले मत्सर, वासना, क्रोध यांचीही आपल्याला ते क्षमा करतात. आपले ममत्व, क्षुल्लक, मत्सरी वागणे, गविष्ठपणा, हव्यास, अहंकारी स्वभाव, व चुकीच्या गोष्टींच्यापुढे आपले–मान तुकविणे, यांचीही ते आपल्याला क्षमा करतात.

परंतु प्रत्येक क्रियेची प्रतिक्रिया असते. आणि ते क्षमा करतात त्यावेळी त्यांना वाटते की त्यांनी तुम्हाला फार मोठी सवलत दिली आहे. आणि त्याची प्रतिक्रिया, जे कोणी क्षमा केल्यावर अधीक मोठ्या चुका करतात, त्यांच्यावरील क्रोधाच्या रुपात वाढत जाते, विशेषतः आत्मसाक्षात्कारानंतर, आत्मसाक्षात्काराचे एवढे आशिर्वाद मिळाल्याने, तुम्हाला एवढा मोठा प्रकाश मिळूनही, त्या प्रकाशात तुम्ही तुमच्या पाळीलाच धरून बसाल, तर त्यांचा क्रोध वाढतो. कारण तुम्ही किती मुर्ख आहात, ते त्यांना दिसते.

मला हे म्हणायचे आहे की व्यक्तिला आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर श्रीशिव जागृत होतात. कारण लोकांना क्षमा करूनही, त्यांना आत्मसाक्षात्कारासारखी एवढी मोठी गोष्ट देऊनही ते चुकीच्या गोष्टी करतात. तर श्रीशिव फारच क्रोधायमान होतात, मग त्या संतुलनातील क्षमाशीलता कमी होत जाऊन क्रोध वाढत जातो.

परंतु ते जेव्हा क्षमा करतात आणि त्या क्षमेचा परिणाम म्हणून तुम्ही ऋषी होता, तेव्हा त्यांचे आशिर्वाद तुमच्याकडे प्रवाहित होतात. ते दुसऱ्यांना क्षमा करण्याची फार मोठी क्षमता तुम्हाला देतात. तुमचा राग ते शांत करतात. तुमची वासना ते कमी करतात तुमचा त्रास ते कमी करतात. सुंदर अशा दवबिंदूंच्या प्रमाणे त्यांचे आशिर्वाद आपल्या देहावर पेतात आणि आपण खरोखर सुंदर फुलांच्यासारखे होतो. त्यांच्या आशिर्वादाच्या सुर्यप्रकाशात आपण चमकतो.

आता, 'श्रीशिव; त्यांचा क्रोध व विनाशशक्ति, आपल्याला त्रास देण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी वापरतात.' साक्षात्कारी जीवांचे प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक मार्गाने संरक्षण करतात सहज योग्यावर विरोधी शक्ति आक्रमण करतात, पण श्रीशिवांची प्रचंड संरक्षक शक्ति ते आक्रमण निष्प्रभ करते. ते आपल्याला चैतन्य लहरींची जाणीव देतात त्याच्या द्वारे ते आपल्याला सन्मार्गावर रहाण्यास मदत करतात. त्यांच्या सर्व सुंदर आशिर्वादाचे वर्णन 'सामवेदात'

'परमेश्वर माझा गुराखी' या कवितेत केले आहे की गुराख्यासारखे ते तुमचा किती काळजीपूर्वक संभाळ करतात.

पण ते या दुष्ट लोकांची काळजी घेत नाहीत. त्यांना नष्ट करतात. सहज योगात आल्यावरही अद्याप ज्यांची दुष्ट प्रवृत्ती तशीच आहे, त्यांचा नाश होतो. जे सहज योगात येऊनही ध्यान करीत नाहीत ते सहज योगाच्या बाहेर फेकले जातात. जे परमेश्वराच्या विरोधात कुरबुर करतात आणि सहज योग्याला अशोभनीय असे वागतात, त्यांना ते काढून टाकतात. तेव्हा एका शक्तिने ते संरक्षण करतात, तर दुसऱ्या शक्तिने ते दूर फेकून देतात. परंतु त्यांची संहार शक्ति फारच साठत जाते. तेव्हा आपण म्हणतो. 'आता एकादश रुद्र कार्यान्वित आले आहेत.'

श्रीकल्की कार्य करू लागतील त्यावेळी एकादश रुद्र प्रकट होतील. म्हणजे जी काही विरोधी शक्ति या पृथ्वीवर आहे, तिचा हा संहार शक्ति विनाश करेल व जे चांगले आहे, त्याला वाचवेल.

तेव्हा सहज योग्यांनी त्यांची उन्नति लवकर साध्य करणे आवश्यक आहे. सामाजिक जीवन, कौटुंबिक जीवन अथवा परमेश्वराने त्यांना जे जे आशिर्वाद दिले आहेत, त्यांच्यातच रममाण प्रापंचिक सुखाचे होऊन बसू नये. परमेश्वराने आपल्याला काय दिले आहे हे आपण नेहमीच पहातो आपल्यासाठी त्यांनी किती आश्चर्यकारक गोष्टी केल्या ते पाहतो. पण आपण आपल्या स्वतःसाठी काय केले आहे, आपल्या उत्थानासाठी, प्रगतीसाठी काय करीत आहोत ते पहायला हवे.

卐 卐

---

फक्त सहजयोगी यांच्या वैयक्तिक मार्गदर्शनाकरिता
(सार्वजनिक विक्रीकरिता नाही.)